## मवैआसे गट-अ संवर्गातील अस्थायी वैद्यकिय अधिका-यांचे समावेशन मुलाखत दि.६.२.१०

दि.३१.१२.२००७ रोजी ३ वर्षे अथवा त्यापेक्षा अधिक शासन सेवा व दि.२.२.०९ ते आजतागायत सेवेत कार्यरत असलेल्या अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी

## निवेदन

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (जूनी वेतनश्रेणी रु. ८०००-१३५०० व नविन वेतनश्रेणी १५६००-३९१००,ग्रेडपे-५४००) संवर्गात सद्यःस्थितीत कार्यरत असणाऱ्या ज्या अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांना दि.३१.१२. २००७ रोजी तीन वर्षे अथवा त्यापेक्षा अधिक शासन सेवा झालेली आहे, अशा अस्थाई एम.बी.बी.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांचे शासन सेवेत कायमस्वरुपीने समावेशन करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्याकरीता सदरहू अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कागदपत्रांची छाननी करणे व पसंतीक्रम विचारात घेण्याच्या दृष्टिने खालील दिनांकानुसार कार्यक्रम आखण्यात आला असून त्यासमोर नमूद केलेल्या नियुक्तीधारकांनी ***आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१*** येथे तळ मजल्यावरील सभागृहात सकाळी ११.०० वाजता स्वः खर्चाने उपस्थित रहावे.

| मुलाखतीचा दिनांक | मुलाखतीकरीता बोलविण्यात येणाऱ्या अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांचा तपशिल |
|---|---|
| ०६.०२.२०१० | **दि.९.२.०९ ते १३.२.०९ या कालावधीत समावेशन प्रक्रियेत प्रलंबित ठेवण्यांत आलेले, समावेशनात राहुन गेलेले व समावेशनासाठी न्यायालयात याचिका दाखल केलेले न्यायालयीन अस्थाई वैद्यकिय अधिकारी.** |

**सुचना :-**

१) मुलाखतीकरीता आलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र तपासणीसाठी छाननीपत्र दिले जाईल. खाली नमूद केलेली मुळ प्रमाणपत्रे व त्याच्या एक प्रतीत साक्षांकनासह (अस्टेस्टेड) छायांकीत प्रती आणाव्यात. (सांक्षाकित करणा-या अधिका-यांचे नांव, पदनाम व शिक्का असावा.)

http://maha-arogya.gov.in

ए) शालांत परीक्षा प्रमाणपत्र / जन्मतारखेचा पुरावा
बी) अधिवासाचे प्रमाणपत्र (डोमीसाईल सर्टिफिकेट)
सी) पदवी प्रमाणपत्र
डी) पदव्युत्तर पदवी/पदविका प्रमाणपत्र
इ) जातीचे प्रमाणपत्र
एफ) जातीचे वैद्यता प्रमाणपत्र
जी) नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र
एच) अपंग असल्यास त्यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याकडील प्रमाणपत्र
आय) वैद्यक व्यवसायाचे कायम नोंदणी प्रमाणपत्र
जे) वेळोवेळी नियुक्ती दिलेल्या आदेशाच्या आदेशाच्या प्रती व रुजू अहवाल
के) मॅट/उच्च न्यायालयात दावा दाखल केलेला असल्यास न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रती
एल) वरील कागदपत्रांसह उमेदवाराने अलीकडील काळात काढलेले पासपोर्ट साइझ आकाराचे एक रंगीत छायांचित्र जोडावे.
एम) उमेदवाराने स्वतंत्र अर्जात कायमचा पत्ता व पत्रव्यवहाराचा पत्ता तसेच तात्काळ संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक नमूद करावा.
एन) रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विहीत नमुन्यात एकवेळचे समावेशनासंबंधीच्या अटी व शर्ती मंजूर असल्याबाबत हमीपत्र सादर करावे. सदर हमीपत्राचा नमुना उपलब्ध करण्यात येत आहे. सदरहू हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
ओ) दि.२.२.०९ रोजी कोठे कार्यरत होते याचा पुरावा (संबंधित जि.आ.अ किंवा जि.शल्यचिकित्सकांचे सही शिक्याचे मुळप्रमाणपत्र.)
पी) सद्यस्थितीत कोठे कार्यरत आहात यांचा पुरावा संबंधित जि.आ.अ किंवा जि.शल्यचिकित्सकच्या सही शिक्याचे मुळप्रमाणपत्र.

२) शासन सेवेत प्रथम हजर झालेल्या अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुलाखतीकरीता प्रथम बोलविण्यात येईल.

३) वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुलाखतीच्या वेळी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रिक्त असलेल्या पदांचा तपशिल पुरविला जाईल. त्यानुसार त्यांनी पसंतीच्या पदस्थापनेची मागणी मुलाखतीच्या वेळी करावी. सदरहू जागा उपलब्ध असल्यास व शैक्षणिक अर्हता विचारात घेवून पदस्थापना दिली जाईल.

४) मागास प्रवर्गातील जातीचे वैद्यता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांना जातीचे वैद्यता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक असेल.

५) मुलाखतीकरीता उपस्थित राहणाऱ्या अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समावेशन व पदस्थापनेचे आदेश नंतर निर्गमित करण्यात येतील.

६) मुलाखतीच्या वेळी अनुपस्थित राहणाऱ्या अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांना समावेशन करण्याची आवश्यकता नाही, हे गृहित धरुन त्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येईल.

http://maha-arogya.gov.in

७) मुलाखतीकरीता वैद्यकीय अधिकाऱ्यांना स्वःखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

# हमीपत्राचा नमुना

## (रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर लिहून द्यावयाचे हमीपत्र

## नियुक्तीसाठी अटी व शर्ती :-

१) समावेशनानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांना १० वर्षे ग्रामीण/ आदिवासी भागात शासन सेवा करण्याची माझी तयारी आहे.

२) समावेशनानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी (जूनी वेतनश्रेणी रु. ८०००-१३५०० व नविन वेतनश्रेणी १५६००-३९१००,ग्रेडपे-५४००) अनुज्ञेय असेल. त्यानुसार प्रत्येक वर्षी पुढील वेतनवाढी नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

३) समावेशनाची संधी ही एकदाच देण्यात येवून ती अंतिम संधी राहील.

४) ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी अथवा फौजदारी प्रकरणे सुरु आहेत, त्यांचे समावेशन अधिन राहून करण्यात येईल. त्यामुळे सदरहू प्रकरणाच्या अंतिम निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

५) सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता पुढील सहा वर्षाकरीता प्रवेश दिला जाणार नाही.

६) परिविक्षा कालावधी दोन वर्षाचा असेल.

७) समावेशनापूर्वीची अस्थाई सेवा सलग करण्यात येणार नाही.

८) समावेशनानंतर परिभाषिक अंशदान सेवा योजना लागू राहील.

मंत्रीमंडळाने पारित केलेल्या वरील सर्व अटी मला मान्य आहेत.

उमेदवारांची स्वाक्षरी

( उमेदवाराचे नाव )

http://maharogya.gov.in

# अ) छाननीपत्राचा नमुना(अस्थाई वै.अ.ने सादर करावयाचा)दि ६.२.१०

यादीतील क्रमांक

अलिकडील काळातील काढलेले रंगीत छायाचित्र (त्यावर स्वतः स्वाक्षरी करावी)

| | |
|---|---|
| परिमंडळाचे नांव | |
| संपूर्ण नांव (आडनाव प्रथम) | |
| दि.२.२.०९ रोजी ते आजतागायत कार्यरत पदस्थापना | |
| जन्मदिनांक | |
| जातीचा प्रवर्ग व तपशिल | |
| शैक्षणिक अर्हता | |
| पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारक असल्यास विषय (पी.जी.) | |
| प्रथम नियुक्तीनुसार हजर झाल्याचा दिनांक व आजतागायत सा.आ.वि.अंतर्गत केलेल्या सेवेचा कालावधीनिहाय विस्तृत तपशिल. | |
| आजरोजी घेत असलेले मूळ वेतन (एकस्तर उच्चवेतनश्रेणी वगळून) | |
| प्रथम नियुक्तीनंतर एकावेळी दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे खंड असल्यास, त्या कालावधीचा संपूर्ण तपशिल व खंड पडण्याचे कारण. | |
| अस्थाई सेवेत असतांना राजीनामा दिला असल्यास राजीनामा देण्याचे कारण, राजीनामा मंजूरीचा दिनांक व कार्यालयाचे नांव. | |
| अस्थाई सेवा समाप्त केली असल्यास सेवा समाप्तीचे कारण व दिनांक | |
| सेवा सोडली असल्यास / कार्यमुक्त केले असल्यास तसे कारण व दिनांक | |
| कायमचा पत्ता | |
| पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | |

टिपः-माहिती देण्यासाठी पुरेशी जागा नसल्यास स्वतंत्र कागद जोडून परिपूर्ण माहिती सादर करावी.

http://maha-arogya.gov.in

***ब)<u>माझ्या शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.</u>***

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | जोडलेले आहे किंवा नाही (होय/नाही) |
|---|---|---|
| १ | शालांत परीक्षा प्रमाणपत्र / जन्मतारखेचा पुरावा | |
| २ | अधिवासाचे प्रमाणपत्र (डोमीसाईल सर्टिफिकेट) | |
| ३ | पदवी प्रमाणपत्र | |
| ४ | पदव्युत्तर पदवी/पदविका प्रमाणपत्र | |
| ५ | प्रमाणपत्र (मागास प्रवर्गातील असल्यास तपशिल उदा.जातीचा प्रवर्ग व जातीचा उल्लेख करावा. | |
| ६ | जातीचे वैद्यता प्रमाणपत्र | |
| ७ | नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र | |
| ८ | अपंग असल्यास त्यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याकडील प्रमाणपत्र | |
| ९ | वैद्यक व्यवसायाचे कायम नोंदणी प्रमाणपत्र | |
| १० | वेळोवेळी नियुक्ती दिलेल्या आदेशाच्या आदेशाच्या प्रती व रुजू अहवाल | |
| ११ | कार्यमुक्त केल्याच्या / राजीनामा मंजूर केल्याच्या आदेशाच्या /सेवासमाप्त केल्याच्या आदेशाच्या प्रती | |
| १२ | मॅट/उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे काय१. | |
| १३ | असल्यास न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रती जोडल्या आहेत काय१. | |
| १४ | हमीपत्र जोडले आहे काय१. | |
| १५ | विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित आहे काय१. | |
| १६ | बी.ए.एम.एस.अर्हताधारक वैद्यकिय अधिका-यांनी शेवटची वेतनचिठठी, प्रथम व शेवटच्या नियुक्ती आदेशाची प्रत जोडली आहे काय१. | |
| १६ | २.२.०९ रोजी सेवेत कार्यरत असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मुळ प्रमाणपत्र. | |
| १७ | २.२.०९ ते आजतागायत कार्यरत असलेले पदस्थापना ठिकाणाबाबतचे जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मुळ प्रमाणपत्र. | |

| | |
|---|---|
| पदस्थापनेकरीता पसंतीक्रम | १) .................... २)................<br>३)...................... ४)................<br>५).................... |

वर नमूद केलेली माहिती खरी असून ती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास त्याबाबत माझ्याविरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल, याची मला जाणिव आहे. शासनाने समावेशनाबाबत प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील सर्व अटी बंधनकारक असून मला त्या मान्य आहेत.

आपला विश्वासू,

अस्थाई वैद्यकिय अधिका-यांचे नांव
व स्वाक्षरी.

http://maharogya.gov.in

# मुख्य प्रशासकिय अधिकारी / प्रशा.अधिकारी यांचा तपासणी अहवाल.

वरील माहीती मुळ कागदपत्रावरुन तपासली त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

(टिपः-पदस्थापनेसाठी शिफारस करावयाची किंवा कसे, याबाबत कारणमिमांसासह स्पष्ट अभिप्राय द्यावेत. तसेच अभिप्रायाकरिता जागा कमी असल्यास मागील पृष्ठावर अभिप्राय नमूद करावेत.)

**दिनांकः-६.२.२०१०**

**अभिप्रायः-**

**प्रशा.अधिका-यांची स्वाक्षरी.** **मुख्य प्रशासकिय अधिका-यांची स्वाक्षरी.**

## पदस्थापना देणा-या अधिका-यांचे अभिप्राय

सदरहू वैद्यकिय अधिका-यांना त्यांच्या पसंतीक्रम व मौखिक मुलाखतीअंती खालीलप्रमाणे पदस्थापना सुचविण्यांत येत आहेः-

| |
|---|
| |

टिपः-काही कारणास्तव पदस्थापनेचे आदेश स्थगीत करावयाचे असल्यास तसा अभिप्राय द्यावा.

| | | |
|---|---|---|
| वैद्यकिय अधिका-यांची स्वाक्षरी | शिफारस करणा-या अधिका-यांची स्वाक्षरी | शिफारस करणा-या अधिका-यांची स्वाक्षरी |

## आदेश निर्गमित करणा-या अधिका-यांचे अभिप्राय.

१.आदेश निर्गमित करण्यांत आले अथवा

२.खालील कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी आदेश स्थगित ठेवले.

**आदेश निर्गमित करणा-या अधिका-यांची सही**

http://maha-arogya.gov.in

http://maha-arogya.gov.in